सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/६८४ दि. २१/०२/२०२४

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'कलासंगम' आणि 'मायमराठी उत्सव मराठीचा' या उपक्रमामध्ये स्वयंसेवक सहभागाबाबत

महोदय,

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाला यंदा साडेतीनशेवर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने राज्यात अनेक उपक्रम राबविले जात आहेत. येत्या १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती मोठया उत्साहाने साजरी करण्यात आली आणि २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा होणार आहे. मराठी अस्मितेशी संबंधित या दिवसांच्या दरम्यान, मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती, कला याबाबतचा 'कलासंगम' आणि 'मायमराठी उत्सव मराठीचा' हा उपक्रम महाराष्ट्र टाइम्सतर्फे पुण्यात साजरा केला जात आहे.

यंदाचा कलासंगम दि. २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी गोखले इन्स्टिट्यूटच्या प्रांगणात ज्ञानवृक्षाखली रंगणार आहे. काव्यमैफल, अभिवाचन, दिग्गजांच्या मुलाखती, मराठी बॅंड, सांगीतिक कार्यक्रम, चित्रकला–शिल्पकला यांचे प्रदर्शन आणि प्रात्यक्षिक, विविध कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शन असे अनेक कार्यक्रम 'कलासंगम' मध्ये होणार आहेत. या शिवाय २७ फेब्रुवारी रोजी गोपाळकृष्ण गोखले (फर्ग्युसन कॉलेज) रस्त्यावर 'कलापथ' उपक्रम राबविण्यात येणार आहे. कलासंगम प्रमाणेच कलापथावरही सर्व कलांचा आविष्कार असणार आहे. पुण्यातील नामवंत कलाकार आणि साहित्यिक या दोन्ही उपक्रमांत सहभागी होणारा आहेत.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रासेयो स्वयंसेवकांना या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता आवाहन करण्यात यावे. तसेच काव्यप्रेमीसाठी कवीकट्टा या उपक्रमात स्वरचीत कवीता विद्यार्थ्यांना सादर करता येतील. अधिक माहितीकरिता सोबत जोडलेल्या पत्राचे आणि माहितीपत्रकाचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : श्रीधर लोणी, निवासी संपादक, महाराष्ट्र टाइम्स

**Shridhar Loni**
Resident Editor,
Maharashtra Times, Pune

महाराष्ट्र टाइम्स

प्रति,

**मा. प्राचार्य**

...............................

...............................

सप्रेम नमस्कार,

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला यंदा साडेतीनशे वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने राज्यात अनेक उपक्रम राबविले जात आहेत. येत्या १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती आहे आणि २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी अस्मितेशी संबंधित या दोन दिवसांच्या दरम्यान, मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती, कला यांबाबतचा 'कलासंगम' आणि 'मायमराठी-उत्सव मराठीचा' हा उपक्रम महाराष्ट्र टाइम्सतर्फे पुण्यात साजरा केला जात आहे.

यंदाचा कलासंगम २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी गोखले इन्स्टिट्यूटच्या प्रांगणात ज्ञानवृक्षाखाली रंगेल. काव्यमैफल, अभिवाचन, दिग्गजांच्या मुलाखती, मराठी बँड, सांगीतिक कार्यक्रम, चित्रकला-शिल्पकला यांचे प्रदर्शन आणि प्रात्यक्षिक, विविध कार्यशाळा, ग्रंथप्रदर्शन असे अनेक कार्यक्रम 'कलासंगम'मध्ये होतील. या शिवाय २७ फेब्रुवारी रोजी गोपाळकृष्ण गोखले (फर्ग्युसन कॉलेज) रस्त्यावर 'कलापथ' उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'कलासंगम'प्रमाणेच 'कलापथा'वरही सर्व कलांचा आविष्कार असणार आहे. पुण्यातील नामवंत कलाकार आणि साहित्यिक या दोन्ही उपक्रमांत सहभागी होत आहेत. आपणही त्यामध्ये सहभागी व्हावे, यासाठी हे आग्रहाचे आमंत्रण.

याखेरीज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती याबाबत विविध शाळा, महाविद्यालये आणि संस्था यांकडून होणाऱ्या कार्यक्रमांना 'मायमराठी-उत्सव मराठीचा' या उपक्रमांतर्गत प्रसिद्धी देणार आहोत. आपल्या संस्थेतर्फे १९ ते २७ फेब्रुवारी या काळात आपण मराठी साहित्य-संस्कृती यांच्याशी संबंधित; तसेच शिवाजी महाराजांची थोरवी सांगणारे कार्यक्रम राबविणार असाल, तर 'महाराष्ट्र टाइम्स'ला जरूर कळवा. त्यांना 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल. 'महाराष्ट्र टाइम्स'वरील आपला स्नेह या निमित्ताने प्रदर्शित करून या उपक्रमामध्ये आपण सहभागी व्हाल, अशी खात्री आहे. माय मराठीचा हा उत्सव आपण सर्वांनी जोरात साजरा करू.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

आपले

**पराग करंदीकर**
संपादक

**श्रीधर लोणी**
निवासी संपादक

Maharashtra Times, Times House, 2nd Floor, 577, Shivaji Nagar, Namdar Gopalkrishna Gokhale Road, Pune - 411004.
Phone : 020 30112222 | Fax : 30117500 | Email : matapune@timesgroup.com

# महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स
कलासंगम

# गझल, स्केचिंग सिनेमा आणि यू-ट्यूब...

विविध कलात्मक कार्यक्रमांसोबतच कार्यशाळा हा 'महाराष्ट्र टाइम्स' आयोजित 'कलासंगम'चा महत्त्वाचा भाग. यामध्ये सहभागाची संधी वाचकांना असून, त्यासाठी त्वरीत नावनोंदणी करा.

## कार्यशाळांचे स्वरूप

- गझलची बाराखडी : मार्गदर्शक – गझल लेखक अनिल आठलेकर
- तंत्र स्केचिंगचे : मार्गदर्शक – प्रसिद्ध चित्रकार श्रीकांत जाधव
- सिनेमा कसा पाहावा? : सुहास किर्लोस्कर
- यू-ट्यूबर कसं व्हायचं? : सौमित्र पोटे

## नावनोंदणीसाठी...

- आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व सहभागी होण्याची कार्यशाळा अशी माहिती mtpunetimes@timesgroup.com या ई-मेलवर पाठवावी.
- 'सब्जेक्ट बॉक्स'मध्ये कार्यशाळेच्या नावाचा उल्लेख करावा.
- कार्यशाळा सगळ्यांसाठी विनामूल्य खुली आहेत.

# महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स
कलासंगम

## कॉलेज विद्यार्थ्यांसाठी
बहरणार
# कवीकट्टा

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, कविता सुचण्याचा योग्य काळ आणि स्थळ म्हणजे शाळा-कॉलेज. कॉलेजच्या रंगतदार वातावरणात वावरताना तुम्हाला अनेक कविता सुचतात. त्यासाठीचे शब्द हे तुमच्यासाठी फक्त शब्द नाही, तर अनुभवाचे बोल असतात. अभिव्यक्तीमधून आलेल्या या कविता व्यासपीठावर सादर करण्याची संधी तुम्हाला 'महाराष्ट्र टाइम्स' आयोजित 'कलासंगम'मध्ये मिळणार आहे.
त्यासाठी,- **mtpunetimes@timesgroup.com**

**या ई-मेलवर स्वरचित दोन कविता पाठवाव्यात.**

- विद्यार्थ्यांनी कविता पाठवताना ई-मेलच्या 'सब्जेक्ट बॉक्स'मध्ये 'कॉलेजस्तरीय **विभागासाठी कविता' असा उल्लेख करावा.**
- कवींनी कविता पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांकही द्यावा.
- कवितेच्या विषयाला बंधन नसले, तरी परीक्षकांनी निवडलेल्या कवितांनाच सादरीकरणाची संधी मिळेल.
- २४ फेब्रुवारी रोजी गोखले इन्स्टिट्यूटच्या आवारात हे कविसंमेलन होईल.

# महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स कलासंगम

## काव्यप्रेमींसाठी
## कवीकट्टा

असे म्हणतात, काव्य म्हणजे मनात उमटणाऱ्या विविधरंगी भावनांना मिळालेले शब्दरूप. काव्य सुचण्यासाठी स्थळ, काळ, वेळ या कशाचेही बंधन नसते. काव्यातून नेहमीच संवेदनशील अभिव्यक्तीचे दर्शन घडते. त्यासाठीचे शब्द हे तुमच्यासाठी फक्त शब्द नाही, तर अनुभवाचे बोल असतात. अभिव्यक्तीमधून आलेल्या या कविता व्यासपीठावर सादर करण्याची संधी तुम्हाला महाराष्ट्र टाइम्स आयोजित कलासंगममध्ये मिळणार आहे.

त्यासाठी,- **mtpunetimes@timesgroup.com**

**या ई-मेलवर स्वरचित दोन कविता पाठवाव्यात.**

- कविता पाठवताना ई-मेलच्या 'सब्जेक्ट बॉक्स'मध्ये **'कविसंमेलनासाठी कविता'** असा उल्लेख करावा.
- कवींनी कविता पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांकही द्यावा.
- कवितेच्या विषयाला बंधन नसले, तरी परीक्षकांनी निवडलेल्या कवितांनाच सादरीकरणाची संधी मिळेल.
- २४ फेब्रुवारी रोजी गोखले इन्स्टिट्यूटच्या आवारात हे कविसंमेलन होईल.

महाराष्ट्र टाइम्स

# कलासंगम





# बात खास, बंदिशींची...

## साँझ की बेर सुमिर हरी नाम
## जो ही सबको करत भवपार...

श्रोतेहो,

अशा अनेक बंदिशी 'कहत गुनिजान' या मैफलीतून ऐकण्याची संधी आहे. सादरकर्ते आहेत, प्रसिद्ध शास्त्रीय गायिका अपर्णा केळकर, संवादक आणि संवादिनी संगत डॉ. चैतन्य कुंटे आणि तबलासाथ कौशिक केळकर यांची.

गुरू-शिष्य नात्यावर आधारित या कार्यक्रमात विविध बंदिशीची पेशकश, ती आकारास येण्यामागची गोष्ट आणि तिच्या सांगीतिक-साहित्यिक मूल्यांच्या सादरीकरणाचीही रंगत.

दिनांक : २५ फेब्रुवारी, रविवार

वेळ : संध्या. ४.३० वा.

स्थळ : गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या प्रांगणातील ज्ञानवृक्ष

महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स

# कलासंगम

# ‘मटा कलासंगम’ची बहारदार सुरुवात



ज्येष्ठ चित्रकार आणि साहित्यिक सुहास बहुळकर यांच्या हस्ते ‘कलासंगम’चे उद्‌घाटन; उद्‌घाटनानंतर बहुळकर यांच्यासोबत कला आणि विचारधारा याबद्दलचा मुक्तसंवादही रंगणार.

प्रेक्षकहो,

या कार्यक्रमासाठी तुम्हाला आग्रहाचे निमंत्रण.

दिनांक : २४ फेब्रुवारी, शनिवार

वेळ : संध्या. ५ वा.

स्थळ : गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या प्रांगणातील ज्ञानवृक्ष

महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स

कलासंगम

# कलात्मक

# कार्यशाळा


विविध सांस्कृतिक–साहित्यिक–कलात्मक कार्यक्रमांसोबतच **'मटा कलासंगम'**मध्ये कार्यशाळांचेही आकर्षण.



प्रसिद्ध समीक्षक

**सुहास किर्लोस्कर**

यांची चित्रपट रसग्रहण कार्यशाळा : दु. २ वा.



यू-ट्यूबर **सौमित्र पोटे**

यांची यू-ट्यूबर कसे व्हायचे हे सांगणारी कार्यशाळा : दु. ३ वा.

**दिनांक : २५ फेब्रुवारी, रविवार**

स्थळ : गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या प्रांगणातील ज्ञानवृक्ष

टीप : कार्यशाळा सर्वांसाठी विनामूल्य खुल्या :

# सांगीतिक कलासंगम

प्रसिद्ध गायक **पं. संजीव अभ्यंकर** यांच्या मुलाखतीचा विशेष कार्यक्रम. त्यांचा सांगीतिक प्रवास उलगडण्यासोबतच काही रचनांचे सादरीकरणही.



| कधी | कुठे |
|---|---|
| २५ फेब्रुवारी, रविवार सायंकाळी ५.३० वा. | गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या प्रांगणातील ज्ञानवृक्ष |

महाराष्ट्र टाइम्स कलासंगम

# कवितांनी भारलेली संध्या

## कविताप्रेमींसाठी 'मटा कलासंगम'ची विशेष सांगीतिक भेट...





डॉ. सलील कुलकर्णी यांचा 'कवितेचे गाणे होताना...' हा विशेष कार्यक्रम

ना. घ. देशपांडे, सुरेश भट, अनिल कांबळे, बा. भ. बोरकर आणि संदीप खरे अशा विविध कवींनी लिहिलेल्या प्रेमकविता–विरहकविता होणार सादर.

सोबत, संदीप खरे यांच्या अप्रकाशित कविताही.

तबलासाथ आदित्य आठल्ये.

दिनांक : २५ फेब्रुवारी, रविवार
वेळ : संध्या. ७ वा.
स्थळ : गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या प्रांगणातील ज्ञानवृक्ष


महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स

# कलासंगम

# म्युझिकल्सचा नजराणा

## 'सीएस म्युझिक ओरिजनल्स'चा म्युझिकल नजराणा
## शिवबा, दान पावलं, मीरा, राधा बावरी...
## अशा अनेक रचनांची पेशकश



**दिनांक :**
२४ फेब्रुवारी, शनिवार

**वेळ :** रात्री ८ वा.

**स्थळ :**
गोखले राज्यशास्त्र
आणि अर्थशास्त्र
संस्थेच्या प्रांगणातील
ज्ञानवृक्ष

महाराष्ट्र टाइम्स